# Ashiyana Co-operative Housing Society Ltd

## Minutes of the Special General Body Meeting (SGM)

- **Date:** 02/08/2026 (Sunday)
- **Time:** 5:00 PM
- **Venue:** Siddhivinayak Temple Hall, 1st Floor, Sector – 5, Airoli, Navi Mumbai.

The Special General Body Meeting of Ashiyana Co-operative Housing Society Ltd. was scheduled on August 2, 2026, at 5:00 PM at Siddhivinayak Temple Hall, Sector – 5, Airoli, Navi Mumbai. Due to the lack of a quorum at the scheduled time, the meeting was adjourned for half an hour in accordance with the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and the Society's Bye-laws. The meeting subsequently commenced at 5:30 PM with a total of 59 members present.

Honorary Secretary Mr. Sanjay Dhumal welcomed all attendees and initiated the proceedings. Following this, Chairman Mr. Narayan Borude, Vice Chairman Mr. Kishor Pendharkar, and Treasurer Mr. Haribhau Dhanurkar briefed the members in detail regarding the necessity of the proposed redevelopment, the overall procedure, objectives, future benefits, and upcoming course of action. All member queries were addressed satisfactorily.

A resolution was placed before the floor to grant in-principle approval for the redevelopment through a developer and to obtain written consent from members. The resolution was proposed by Mr. Pravin Dalvi and seconded by Mr. Laxmikant Khole. Following a thorough discussion, all 59 members present unanimously passed the resolution by a show of hands and subsequently signed consent letters recording their in-principle approval.

During the discussion, Mr. Pravin Dalvi expressed full confidence in the Managing Committee and commended their work to date, trusting that the committee will carry out the entire redevelopment transparently and in the Society's best interest. Mr. Laxmikant Khole then proposed establishing an independent Redevelopment Committee to assist the Managing Committee. The resolution to form this committee was moved by Mr. Tushar Varadkar, seconded by Mr. Chandramohan Singh Rawat, and unanimously approved by the members.

Mr. Chandrababu Divakaran suggested including individuals with technical expertise in civil engineering and construction on the committee. Acknowledging his extensive

engineering background and technical expertise, the members unanimously approved Mr. Chandrababu Divakaran's inclusion as a committee member.

It was decided that Mr. Narayan Borude will serve as Ex-Officio Chairman and Mr. Sanjay Dhumal as Ex-Officio Secretary.

The following members agreed to serve on the Redevelopment Committee, and their appointments were unanimously approved:

- Mr. Dashrath Dalvi
- Mr. Pravin Dalvi
- Mr. Chandrababu Divakaran
- Mr. Kailas Joshi
- Mrs. Harshul Rai
- Mrs. Ragini Deshmukh
- Mrs. Anita Selvarajan
- Mr. Laxmikant Khole
- Mr. R. A. Shukla
- Mr. Kishor Mantri
- Mr. Chandramohan Singh Rawat
- Mr. K. S. Singh

Under the guidance of the Managing Committee, the Redevelopment Committee will assist with subsequent procedures, member coordination, information gathering, technical advice, and ensuring a transparent, disciplined, and effective process.

With all agenda items concluded, the Chairman thanked the members for their cooperation and formally adjourned the meeting.

**Place:** Airoli

**Date:** 02/08/2026

**Chairman**

Ashiyana Co-operative Housing Society Ltd.

**Honorary Secretary**

Ashiyana Co-operative Housing Society Ltd.

अशियाना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त (MoM)

दिनांक : 02/08/2026 (रविवार)

वेळ : सायंकाळी 5.00 वा.

स्थळ : सिद्धिविनायक मंदिर हॉल, पहिला मजला, सेक्टर – 5, ऐरोली, नवी मुंबई.

अशियाना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.ची विशेष सर्वसाधारण सभा

दिनांक 02 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजता सिद्धिविनायक मंदिर हॉल, सेक्टर – 5, ऐरोली, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. नियोजित वेळेस आवश्यक कोरम पूर्ण न झाल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 व संस्थेच्या उपविधींनुसार सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी 5.30 वाजता सभा सुरू करण्यात आली.सदर सभेस एकूण 59 सभासद उपस्थित होते. मानद सचिव श्री. संजय धुमाळ यांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत करून सभेच्या कामकाजास प्रारंभ केला. त्यानंतर अध्यक्ष श्री. नारायण बोरुडे, उपाध्यक्ष श्री. किशोर पेंढरकर तसेच खजिनदार श्री. हरिभाऊ धानुरकर यांनी संस्थेच्या प्रस्तावित पुनर्विकासाची आवश्यकता, पुनर्विकासाची प्रक्रिया, त्यामागील उद्देश, भविष्यातील फायदे तसेच पुढील कार्यपद्धती याबाबत उपस्थित सभासदांना सविस्तर माहिती दिली. सभासदांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

यानंतर संस्थेचा पुनर्विकास विकासका (Developer) मार्फत करण्यास तत्वतः मान्यता देणे तसेच त्यासाठी सभासदांची लेखी संमती घेण्याबाबतचा ठराव सभेसमोर मांडण्यात आला. सदर ठरावाचा प्रस्ताव श्री. प्रवीण दळवी यांनी मांडला असून त्यास श्री. लक्ष्मीकांत खोले यांनी अनुमोदन दिले. ठरावावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर उपस्थित सर्व 59 सभासदांनी एकमताने हात वर करून सदर ठरावास मंजुरी दिली. त्यानंतर उपस्थित सर्व 59 सभासदांनी पुनर्विकासास तत्वतः मान्यता दर्शविणाऱ्या संमतीपत्रावर स्वाक्षरी करून आपली लेखी संमती नोंदविली. यानंतर झालेल्या चर्चेदरम्यान श्री. प्रवीण दळवी यांनी विद्यमान व्यवस्थापन समितीवर पूर्ण विश्वास व्यक्त करून समितीने आजपर्यंत केलेल्या कार्याचे कौतुक केले. पुनर्विकासाची संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थापन समिती सभासदांचा विश्वास कायम ठेवून पारदर्शकपणे व संस्थेच्या हिताचा विचार करून यशस्वीरीत्या पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर श्री. लक्ष्मीकांत खोले यांनी पुनर्विकासाच्या संपूर्ण प्रक्रियेस व्यवस्थापन समितीस सहकार्य करण्यासाठी स्वतंत्र पुनर्विकास समिती (Redevelopment Committee) स्थापन करण्याची सूचना सभेसमोर मांडली. या सूचनेवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सदर पुनर्विकास समिती स्थापन करण्याचा ठराव श्री. तुषार वराडकर यांनी सभेसमोर मांडला असून त्यास श्री. चंद्रमोहन सिंग रावत यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सभासदांनी सदर ठरावास एकमताने मंजुरी दिली.

चर्चेदरम्यान श्री. चंद्राबाबू दिवाकरन यांनी पुनर्विकास समितीमध्ये बांधकाम व अभियांत्रिकी क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असलेल्या अनुभवी व्यक्तीचा समावेश असावा, अशी सूचना केली. त्यांच्या सूचनेचा विचार करून उपस्थित सभासदांनी श्री. चंद्रबाबू दिवाकरन यांचा अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव व तांत्रिक ज्ञान लक्षात घेऊन त्यांचा पुनर्विकास समितीमध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यास एकमताने मंजुरी दिली. त्यांच्या अनुभवाचा पुनर्विकास प्रक्रियेत समितीस निश्चितच लाभ होईल, असे मत सभेमध्ये व्यक्त करण्यात आले.

सदर समितीचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून श्री. नारायण बोरुडे व पदसिद्ध सचिव म्हणून श्री. संजय धुमाळ कार्य करतील, असे ठरविण्यात आले.

तसेच खालील सभासदांनी पुनर्विकास समितीमध्ये सदस्य म्हणून काम करण्यास सहमती दर्शविली असून सभेने त्यांच्या नावास एकमताने मंजुरी दिली.

- श्री. दशरथ दळवी
- श्री. प्रवीण दळवी
- श्री.  चंद्राबाबू दिवाकरन
- श्री. कैलास जोशी
- श्रीमती हर्षुल राय
- श्रीमती रागिणी देशमुख
- श्रीमती अनिता सेल्वराजन
- श्री. लक्ष्मीकांत खोले
- श्री.आर. ए. शुक्ला
- श्री. किशोर मंत्री
- श्री. चंद्रमोहनसिंग रावत
- श्री. के एस. सिंग

अशा प्रकारे वरील सदस्यांसह पदसिद्ध अध्यक्ष श्री. नारायण बोरुडे आणि पदसिद्ध सचिव श्री. संजय धुमाळ यांच्या सहभागाने पुनर्विकास समितीची स्थापना करण्यात आली. सदर समिती व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली पुनर्विकासासंदर्भातील पुढील कार्यवाही, सभासदांशी समन्वय, आवश्यक माहितीचे संकलन, तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन तसेच पुनर्विकास प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध व प्रभावीपणे राबविण्यास सहाय्य करेल.

सभेतील सर्व विषयांवरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सभासदांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले व सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

स्थळ : ऐरोली
दिनांक : 02/08/2026

अध्यक्ष
अशियाना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

मानद सचिव
अशियाना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

आशियाना को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसाइटी लि.

## विशेष साधारण सभा का कार्यवृत्त (MoM)

- दिनांक: 02/08/2026 (रविवार)
- समय: सायं 5:00 बजे
- स्थान: सिद्धिविनायक मंदिर हॉल, पहली मंजिल, सेक्टर – 5, ऐरोली, नवी मुंबई।

आशियाना को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसाइटी लि. की विशेष साधारण सभा का आयोजन 02 अगस्त 2026 को सायं 5:00 बजे सिद्धिविनायक मंदिर हॉल, सेक्टर – 5, ऐरोली, नवी मुंबई में किया गया था। निर्धारित समय पर कोरम पूर्ण न होने के कारण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 एवं संस्था के उप-नियमों (बाय-लॉज) के अनुसार सभा आधे घंटे के लिए स्थगित कर दी गई। इसके बाद सायं 5:30 बजे सभा की कार्यवाही शुरू हुई, जिसमें कुल 59 सदस्य उपस्थित थे।

मानद सचिव श्री संजय धुमाल ने उपस्थित सभी सदस्यों का स्वागत कर सभा की कार्यवाही प्रारंभ की। तत्पश्चात अध्यक्ष श्री नारायण बोरुडे, उपाध्यक्ष श्री किशोर पेंढरकर एवं कोषाध्यक्ष श्री हरिभाऊ धानुरकर ने संस्था के प्रस्तावित पुनर्विकास (रीडेवलपमेंट) की आवश्यकता, प्रक्रिया, उद्देश्य, भावी लाभ एवं आगामी कार्यप्रणाली के बारे में सदस्यों को विस्तार से जानकारी दी। सदस्यों द्वारा पूछे गए सभी प्रश्नों के समाधानकारक उत्तर दिए गए।

इसके पश्चात संस्था का पुनर्विकास डेवलपर के माध्यम से कराने हेतु सैद्धांतिक मंजूरी देने तथा सदस्यों की लिखित सहमति प्राप्त करने संबंधी प्रस्ताव सभा के समक्ष रखा गया। इस प्रस्ताव को श्री प्रवीण दलवी ने प्रस्तुत किया तथा श्री लक्ष्मीकांत खोले ने इसका अनुमोदन किया। विस्तृत चर्चा के बाद उपस्थित सभी 59 सदस्यों ने हाथ उठाकर सर्वसम्मति से प्रस्ताव को मंज़ूरी दी और सहमति पत्र पर हस्ताक्षर कर अपनी लिखित सहमति दर्ज कराई।

चर्चा के दौरान श्री प्रवीण दलवी ने वर्तमान प्रबंध समिति (मैनेजिंग कमेटी) पर पूर्ण विश्वास व्यक्त करते हुए उनके कार्यों की सराहना की तथा विश्वास जताया कि समिति सदस्यों का भरोसा कायम रखते हुए पारदर्शिता एवं संस्था के हित में यह प्रक्रिया पूर्ण करेगी। इसके बाद श्री लक्ष्मीकांत खोले ने प्रबंध समिति के सहयोग हेतु एक स्वतंत्र पुनर्विकास समिति (Redevelopment Committee) गठित करने का सुझाव रखा। पुनर्विकास समिति गठित करने का प्रस्ताव श्री तुषार वराडकर द्वारा रखा गया तथा श्री चंद्रमोहन सिंह रावत ने इसका अनुमोदन किया। उपस्थित सदस्यों ने सर्वसम्मति से इस प्रस्ताव को पारित किया।

चर्चा के दौरान श्री चंद्राबाबू दिवाकरन ने सुझाव दिया कि पुनर्विकास समिति में निर्माण एवं इंजीनियरिंग क्षेत्र का तकनीकी ज्ञान रखने वाले अनुभवी व्यक्ति को शामिल किया जाना चाहिए। उनके सुझाव पर विचार करते हुए उपस्थित सदस्यों ने श्री चंद्राबाबू दिवाकरन के दीर्घकालिक इंजीनियरिंग अनुभव और तकनीकी ज्ञान को ध्यान में रखते हुए उन्हें समिति के सदस्य के रूप में शामिल करने को सर्वसम्मति से मंज़ूरी दी।

यह तय हुआ कि श्री नारायण बोरुडे समिति के पदेन अध्यक्ष तथा श्री संजय धुमाल पदेन सचिव के रूप में कार्य करेंगे।

साथ ही निम्नलिखित सदस्यों ने पुनर्विकास समिति के सदस्य के रूप में कार्य करने की सहमति दी, जिसे सभा द्वारा सर्वसम्मति से अनुमोदित किया गया:

- श्री दशरथ दलवी
- श्री प्रवीण दलवी
- श्री चंद्राबाबू दिवाकरन
- श्री कैलास जोशी
- श्रीमती हर्षुल राय
- श्रीमती रागिणी देशमुख
- श्रीमती अनिता सेल्वराजन
- श्री लक्ष्मीकांत खोले
- श्री आर. ए. शुक्ला
- श्री किशोर मंत्री
- श्री चंद्रमोहन सिंह रावत
- श्री के. एस. सिंह

यह समिति प्रबंध समिति के मार्गदर्शन में पुनर्विकास संबंधी आगामी कार्रवाई, सदस्यों से समन्वय, आवश्यक जानकारी जुटाने, तकनीकी विषयों पर मार्गदर्शन देने तथा प्रक्रिया को पारदर्शी, अनुशासित एवं प्रभावी रूप से संचालित करने में सहयोग करेगी।

सभी विषयों पर चर्चा पूर्ण होने के बाद अध्यक्ष महोदय ने उपस्थित सदस्यों का आभार व्यक्त किया और सभा समाप्ति की घोषणा की।

स्थान: ऐरोली

दिनांक: 02/08/2026

अध्यक्ष

आशियाना को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसाइटी लि.

मानद सचिव

आशियाना को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसाइटी लि.